# २० व्या शतकातील महाराष्ट्रातील समाजसुधारक

# घटक २ : शैक्षणिक सुधारक

# २) कर्मावर भाऊराव पाटील

**प्रास्ताविक**

महाराष्ट्रात शैक्षणिक क्रांती घडविणारे थोर समाजसुधारक म्हणून कर्मवीर भाऊराव पाटील उर्फ अण्णा आपणा सर्वांना परिचित आहेत. २२ सप्टेंबर १८८७ रोजी कुंभोज या आजोळच्या गावी ( ता.हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर) झाला. त्यांचे गाव अलगुडे होते. त्यांच्या वडिलांचे नाव पायगोंडा व आईचे नाव गंगाबाई असे होते. त्यांचे प्राथमिक शिक्षण विटा व दहिवडी (सांगली) येथे झाले. त्यांचे वडील सरकारी नोकरीत (रोड कारकून) होते. त्यामुळे भाऊरावांना वडिलांबरोबर भटकंती करत शिक्षण घ्यावे लागले. पाचवी नंतर त्यांना कोल्हापुरातील दिगंबर जैन वस्तीगृहात ठेवण्यात आले. राजाराम हायस्कूल मध्ये त्यांचे माध्यमिक शिक्षण झाले. वसतिगृहातील अधीक्षकांच्या बरोबर झालेल्या वादामुळे स्वाभिमानी भाऊराव पाटील यांनी वसतिगृह सोडले. परंतु राजर्षी महाराजांच्या राजवाड्यातील विद्यार्थी कक्षात त्यांची पुढील सोय झाली. दरम्यान त्यांचे लक्ष्मीबाई बरोबर लग्न झाले. उपजीविकेसाठी त्यांनी शिक्षण सोडून किर्लोस्कर व उगले कारखान्यांचे फिरते एजंट काम सुरु केले. याकाळात त्यांची खूप भ्रमंती झाली. भाऊराव पाटील यांची राहणी अत्यंत साधी होती. महात्मा गांधींच्या उपस्थितीत त्यांनी स्वदेशी प्रचार कार्यक्रमात परदेशी कपड्यांची होळी करून खादी कापड वापरण्याची व अनवाणी फिरण्याची शपथ घेतली होती. त्यांनी खादी वापराचे व्रत अखेरपर्यंत पाळले. भाऊराव पाटील यांच्यावर महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले व महात्मा गांधी यांचा मोठा प्रभाव पडला होता. त्यातून शिक्षणाचे महत्त्व लक्षात आल्याने बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी त्यांनी कार्य सुरु केले वाळवे तालुक्यातील दुधगाव आश्रमाच्या स्थापनेने त्यांचे कार्य सुरु होऊन पुढे भारतभर पसरले व मार्गदर्शकही ठरले.

**कर्मवीरांचे विचार व कार्य**

कर्मवीरांनी बहुजनांच्या शिक्षणासाठी भरीव स्वरूपाचे कार्य केले त्यासाठी त्यांनी अतिशय साधी सोपी विचारधारा अवलंबिली स्वावलंबी शिक्षण त्या विचारांचा महत्त्वाचा भाग होता श्रमाचे महत्त्व विद्यार्थी दशेपासूनच समजावे म्हणून त्यांनी कमवा व शिका या विचाराचा पुरस्कार केला. शिक्षणाला त्यांनी चारित्र्य निर्मितीचे साधन मानले. अनेक उद्देशासाठी त्यांनी शिक्षण

महत्त्वाचे मानले. तसेच तळागाळातील लोकांचा विकास व्हावा त्यांच्यातील अज्ञान अंधश्रद्धा नाहीशी व्हावी अशी त्यांची भूमिका होती आपले विचार प्रत्यक्ष कृतीत आणण्यासाठी त्यांनी पुढील प्रमाणे कार्य केले शिक्षणातून समाज परिवर्तन हे त्यांचे सूत्र होते

**१) रयत शिक्षण संस्थेची स्थापना**

छत्रपती राजर्षी शाहू महाराजांची प्रेरणा व महात्मा जोतीराव फुले पासून स्फूर्ती घेत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात शिक्षणाची गंगा पोहचवण्याचे महान व पवित्र कार्य कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केले. १९०९ मध्ये स्थापन केलेला दुधगाव विद्यार्थी आश्रम हा रयत शिक्षण संस्थेचे बीज आहे. १९१० मध्ये दुधगाव शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना झाली. १९१९ मध्ये सत्यशोधक समाज परिषदेत बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी एखादी संस्था असावी असा भाऊराव पाटील यांनी मांडलेला प्रस्ताव मंजूर करण्यात आला आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ४ ऑक्टोबर १९१९ रोजी काले (तालुका कराड) येथे त्यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. १९३५ मध्ये रयत शिक्षण संस्था नोंदणीकृत संस्था बनली. मागासलेल्या जातीत शिक्षणाची गोडी निर्माण करणे. गरिबांना मोफत शिक्षण देणे. विद्यार्थी निवास अडचण दूर करणे आणि शीलवान विद्यार्थी घडविणे ही उद्दिष्ट्ये ठेऊन या संस्थेची स्थापना करण्यात आली होती. त्यानुसार पुढे संस्थेने वाटचाल केली. १९२४ मध्ये रयत शिक्षण संस्थेच्या वतीने सातारा येथे त्यांनी शाहू बोर्डिंग निर्माण केले तसेच रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून त्यांनी प्राथमिक शिक्षणापासून ते महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत शिक्षणाचा मोठ्या प्रमाणात विस्तार केला आज महाराष्ट्रातील सर्वात मोठी शिक्षणसंस्था म्हणून रयत शिक्षण संस्थेला ओळखले जाते. वटवृक्ष हे या संस्थेचे बोधचिन्ह आहे त्यानुसार वडाच्या झाडाचा जसा विस्तार होतो तसाच महाराष्ट्राच्या विविध भागात शिक्षणाचा विस्तार करण्याचे कार्य कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केले. श्रम, स्वावलंबन व समता या तत्त्वांवर हा शैक्षणिक वटवृक्ष विस्तारला आहे.

**२) शिक्षण विस्तार**

प्राथमिक ते महाविद्यालयीन सर्व प्रकारचे शिक्षण संस्था असाव्या असा कर्मवीर अण्णांचा विचार होता. कारण त्यांना केवळ साक्षरता प्रसार करायचा नव्हता तर घरोघरी अधिकारी व विचारवंत तयार व्हावेत असा त्यांचा प्रयत्न होता. त्यामुळे कला, वाणिज्य, विज्ञान, शिक्षणशास्त्र, विधी, अभियांत्रिकी या विद्याशाखांसह अनेक प्राथमिक, माध्यमिक विद्यालयांची स्थापना त्यांनी केली.कर्मवीर भाऊराव पाटील यांनी प्रथम सातारा जिल्ह्यात

खेडोपाडी प्राथमिक शाळांचे जाळे विणले. १९३६ मध्ये रयत शिक्षण संस्थेचे दुसरे अध्यक्ष रा ब काळे यांच्या नावाने मराठी शाळा सुरु करण्यात आली. १९३८ मध्ये डोंगराळ भागातील मुलांसाठी यवतेश्वर येथे व्हॉलंटरी प्राथमिक शाळा सुरू केली. १९३८ - १९३९ या एकाच वर्षात रयत शिक्षण संस्थेने ६१ प्राथमिक शाळा सुरू केल्या पुढल्याच वर्षी या शाळांची संख्या १०८ पर्यंत गेली.

प्राथमिक शाळाप्रमाणेच त्यांनी माध्यमिक शाळाही सुरू केल्या १९३५ मध्ये साताऱ्यात 'रयत सिल्व्हर ज्युबिली हायस्कूल'ची स्थापना केली. त्यानंतर 'मोफत आणि सक्तीचे शिक्षण' देण्यासाठी त्यांनी अनेक गावांतील शाळा दत्तक घेतल्या. या संस्थेची पहिली माध्यमिक शाळा सातारा येथे महाराजा सयाजीराव हायस्कूल या नावाने १९४० मध्ये सुरू केली. १९५३ - १९५४ या एकाच वर्षात या माध्यमिक शाळांची संख्या ४४ इतकी झाली आज या संस्थेची ३४० हायस्कूल २९ महाविद्यालय ४२ जुनिअर कॉलेज व काही अभियांत्रिकी महाविद्यालये आहेत. १९३५ मध्ये सिल्व्हर ज्युबिली रुरल ट्रेनिंग कॉलेजची स्थापना करण्यात आली. हे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील पहिले खासगी अध्यापक विद्यालय आहे. १९४२ मध्ये महिलांसाठी मिश्र वसतिगृह व जिजामाता अध्यापक विद्यालय सुरू करण्यात आले.

१९४७ मध्ये संस्थेचे मोफत व वसतीगृहासह पहिले महाविद्यालय छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा येथे स्थापन करण्यात आले. ग्रामीण भागातील मुलांसाठी सुरु झालेले हे पहिलेच पदवी महाविद्यालय होते. १९५४ मध्ये कराड येथे सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज सुरु करण्यात आले. याशिवाय अनेक अध्यापक विद्यालय व महाविद्यालय देखील स्थापन केली. १९५५ मध्ये सुरु झालेले आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन प्रसिद्ध आहे.

आज या संस्थेचा झालेला विस्तार प्रचंड आहे. संस्थेची ३२० हायस्कूल, २९ महाविद्यालये व ५७२ प्राथमिक शाळा व वसतिगृहे आहेत. ही संस्था केवळ सातारची नसून महाराष्ट्राच्या १४ जिल्ह्यात पसरलेली भारतातील ती एक विस्तारित संस्थांपैकी एक आहे. सर्वाधिक विस्तार असलेली आशिया खंडातील ही संस्था आहे.

**३) शिक्षकांचे प्रशिक्षण**

शिक्षण हा शिक्षण व्यवस्थेचा कणा असतो. केवळ पोटार्थी नव्हे तर प्रबोधनाचे वाहक शिक्षण भाऊराव यांना अपेक्षित होते.त्यांनी शिक्षकांसाठी विशेष प्रशिक्षण महाविद्यालय सुरु केले. शिक्षकांना ते रयत सेवक म्हणत.शिक्षकांच्या प्रबोधनातून मुले शिक्षण प्रवाहात येत असत

केवळ पुस्तकी नव्हे तर समाजात मिसळणाऱ्या वृत्तीचे व शिस्तीचे शिक्षण त्यांना अपेक्षित होते प्रशिक्षित शिक्षकांमुळे संस्थेचे हेतू सफल झाले. दर्जेदार शिक्षणाची परंपरा निर्माण झाली.

**४) वसतिगृहांची निर्मिती व मुष्टीफंड**

केवळ शाळा सुरु करून प्रश्न सुटणार नाही तर राहण्याच्या अडचणीमुळे गरीब मुलांना शिक्षणापासून वंचित राहावे लागते म्हणून कर्मवीर आण्णांनी वसतिगृहांची सुविधा निर्माण करण्याकडेही लक्ष दिले. त्यांच्या रयत शिक्षण संस्थेने अनेक अद्ययावत वसतिगृहे उभी केली आहेत. ज्यामुळे गरीब होतकरू मुलांना राहण्या खाण्याची सोय होऊन शिक्षण घेता आले. आण्णांनी १९२१ मध्ये वाळवा तालुक्यातील नेरले (जिल्हा सांगली) येथे वसतिगृह सुरु केले. हे वसतिगृह अस्पृश्यांसहित सर्व जाती धर्माच्या विद्यार्थ्यांसाठी खुले होते. १९२४ मध्ये साताऱ्यात आण्णांनी सर्व जाती धर्माच्या विद्यार्थ्यांसाठी मोठ्या वसतिगृहाची निर्मिती (स्थापना) केली. १९२७ मध्ये या वसतिगृहाचे नामांतर 'श्री शाहू बोर्डिंग हाउस' असे करण्यात आले. तर १९३२ मध्ये पुण्यात युनियन बोर्डिंग हाउसची स्थापना करण्यात आली. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी काही नियम केले होते. जसे की, विद्यार्थ्याला शिक्षणाची व स्वावलंबनाची आवड ओढ असावी. विद्यार्थी साधा, सद्गुणी, चारित्र्यसंपन्न व स्वाभिमानी असावा. भेदाभेद व अनिष्ट रूढी पाळणारा नसावा. वसतिगृहातील विद्यार्थ्यांचे वेळापत्रक ही ठरवून दिले होते. पहाटे उठावे लागे. पहाटे झोपलात तर तुमचे नशीबही झोपेल असे अण्णा म्हणत असत. विद्यार्थी व्यसनमुक्त असावा यासाठी ही काळजी घेतली जात असे.

विद्यार्थ्यांच्या शिक्षणातील प्रमुख अडचण निवास व अन्न ही दूर करण्यासाठी त्यांनी विविधस्तरावर प्रयत्न केले. भोजनाचा खर्च भागविण्यासाठी त्यांनी 'मुष्टीफंड' ही योजना सुरू केली. स्त्री जात्यावर दळण्यासाठी बसायची तेव्हा फक्त एक मूठ धान्य तिने दिलेल्या पिशवीत टाकायचे. नंतर वसतिगृहातील मुले किंवा शिक्षक ती पिशवी घेऊन जात. यास मुष्टीफंड किंवा एक झोळी योजना ही म्हणत. लोकांकडून मदत मिळविताना भाऊराव यांनी स्वतःही मोठा त्याग वेळोवेळी केला आहे. सुरुवातीस दुधगाव, कार्ले व नेर्ले येथे सुरु झालेल्या वसतिगृह खर्चासाठी भाऊराव पाटील यांनी पत्नीचे मंगळसूत्र विकले होते.

**५) मुष्टीफंड योजना**

गरीब मुलांना निवास सुविधा देऊन शिक्षण संधी प्राप्त करण्यास अण्णांनी प्रयत्न केले. त्यासाठी वसतिगृह निर्माण केली. राहण्या खाण्याची सुविधा उपलब्ध करून दिली. परंतु या वसतिगृहात भोजन सुविधा देणे त्यासाठी निधी उपलब्ध करणे अत्यंत अवघड काम अण्णांनी फार कष्टपूर्वक केले. भोजनाचा खर्च भागविण्यासाठी त्यांनी १९२४ मध्ये 'मुष्टीफंड' ही योजना सुरू केली. ही केवळ आर्थिक मदतीचे नाही तर लोक सहभागाची चळवळ / योजना होती. घरोघरी स्त्रिया जात्यावर दळत असत. त्या ठिकाणी एक पिशवी ठेवण्यात आली. स्त्रीने जात्यावर दळायला बसताना फक्त एक मूठ धान्य या दिलेल्या पिशवीत टाकावे. अशी अपेक्षा होती. नंतर वसतिगृहातील मुले किंवा शिक्षक ती पिशवी घेऊन जात. यास मुष्टीफंड किंवा एक झोळी योजना ही म्हणत. या योजनेला चांगली लोकप्रियता मिळून ही योजना यशस्वी झाली.

**६) आर्थिक अडचणींवर मात**

१९४८ मध्ये सातारा येथे गांधींना श्रद्धांजली वाहण्यास झालेल्या सभेत मुख्यमंत्र्यांवर टीका केल्याने रयत शिक्षण संस्थेचे अनुदान बंद करण्यात आले होते. त्यामुळे मोठा विस्तार करत असलेल्या संस्थेस धोका निर्माण झाला. पण भाऊराव पाटील यांनी लोक मदतीने संस्था पुढे चालवण्याचा निर्धार केला. अनेकांनी यावेळी केलेल्या कामामुळे संस्थेस मोठा निधी उभा राहिला. अखेर सरकाने संस्थेचे अनुदान पुन्हा सुरु केले. अण्णांना अनेक लोकांनीही शिक्षण कार्यासाठी मोलाची मदत केली आहे. अण्णांना लोकांकडून मदत मिळविताना स्वत:ही वेळोवेळी मोठा त्याग केला आहे. स्वत: अत्यंत हलाखीत जीवन व्यतीत करावे लागले. सुरुवातीस दुधगाव, कार्ले व नेर्ले येथे सुरु झालेल्या वसतिगृह खर्चासाठी भाऊराव पाटील यांनी पत्नीचे मंगळसूत्र विकले होते. अर्थात स्वत: त्यांनी दिलेल्या त्यागातून लोकांपुढे आदर्श निर्माण होऊन अनेक जण त्यांना येऊन मिळाले. सरकारनेही प्रसंगानुसार संस्थेस मदत देऊ केली.

**७) स्वावलंबी शिक्षण व कमवा आणि शिका योजना**

भाऊराव पाटील यांनी शिक्षण प्रसारासाठी अत्यंत मोलाचे व कष्टाचे काम केले. हे काम करत असताना त्यांचे शिक्षण विषय विचार अधिक प्रभावी बनत गेले. शिक्षणाकडे ते साधन म्हणून पाहतात. शिक्षणाचे अनेक फायदे असतात. त्यापैकी स्वावलंबन त्यांना महत्त्वपूर्ण वाटत होते. अण्णांना विद्यार्थी स्वावलंबी वृत्तीचा हवा होता. कष्ट करून समाजाच्या उपयोगासाठी शिका असा अण्णांचा संदेश होता. 'स्वावलंबी शिक्षण'हे त्यांनी संस्थेचे ब्रीद ठेवले होते. म्हणून श्रमालाच त्यांनी पूजा मानली. श्रम मोबदल्यात मोफत शिक्षण दिले. समाजाच्या शेवटच्या

स्तरापर्यंत शिक्षण पोहोचविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. लाचारी न करता श्रमाच्या जोरावर शिक्षण घेण्यास त्यांनी प्रयत्न केले व तशी संधीही उपलब्ध करून देण्यावर भर दिला. थोडक्यात अण्णांनी स्वावलंबी विद्यार्थी व स्वावलंबन रुजविणारे शिक्षण याचा पुरस्कार केला. स्वावलंबी शिक्षण या ब्रीद वाक्य नुसार मुलांना कमवा शिका या योजनेअंतर्गत काम करण्याची संधी दिली.

कमवा आणि शिका योजना ही जागतिकस्तरावर आदर्श ठरलेली योजना आहे. या योजनेमुळे गरजू गरीब व शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना कमवा आणि शिका योजनेमुळे आर्थिक मदत उपलब्ध झाली व श्रमाचे महत्त्वही समजले. गरिबी शिक्षणाच्या आड येऊ दिली नाही. श्रमाला प्रतिष्ठा दिली. यामुळे गरिबांच्या शिक्षणातील अडथळे दूर होऊन त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण झाला आणि त्यांची कौशल्य वृद्धीही झाली. शिक्षण घेण्यासाठी अण्णांनी केलेला हा देशातील पहिलाच ऐतिहासिक प्रयोग असावा. भाऊराव म्हणायचे, 'घामाच्या पैशातून घेतलेले शिक्षण हेच खरे शिक्षण होय." या योजनेनुसार विद्यार्थी महाविद्यालयाच्या ग्रंथालय, प्रयोगशाळा किंवा कार्यालयात अर्धवेळ काम करून स्वयंपूर्ण बनतात. या योजनेमुळे अनेक गरीब विद्यार्थ्यांना आपले शिक्षण खंड न पडता पूर्ण करता आले.

**८) समतेचा पुरस्कार व देशकार्यासाठी शिक्षण**

शिक्षण साध्य नाही ते साधन असून त्यातून समाजाची प्रगती झाली पाहिजे. समता, बंधुता व स्वावलंबन गुणांचा विकास झाला पाहिजे. विद्यार्थ्यात समाजाची बांधिलकी निर्माण होऊन नवसमाज निर्माण झाला पाहिजे. शहाणपण आले पाहिजे. चांगल्या शिक्षणातून राष्ट्र बलवान होते. त्यामुळे असे शिक्षण ही राष्ट्राची गरज आहे. थोडक्यात चांगला विद्यार्थी व त्यातून बलाढ्य राष्ट्र शिक्षणातून निर्माण होते. त्यासाठी अण्णांनी उत्तम नागरिक घडविणारे देशकार्य करणारे शिक्षणाचा पुरस्कार केला आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर संत गाडगेबाबा यांच्या समवेत त्यांनी महाराष्ट्रात सामाजिक समतेचा मोठ्या प्रमाणावर प्रसार केला. जाती व्यवस्था व दारिद्र्यात अडकलेल्या बहुजन समाजाला बाहेर काढण्यासाठी शिक्षण प्रसार केला आपल्या संस्थेत विद्यार्थ्यांना समतेचे व राष्ट्रहिताचे धडे दिले.

**समारोप**

भाऊराव पाटील यांचे कार्य महाराष्ट्राच्या जडणघडणीसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले. अण्णांनी शिक्षण कार्यासाठी अनेक हालअपेष्टा सहन केल्या. खेडोपाडी दूरपर्यंत प्रसंगी पायी प्रवास केला.

स्वत: अनेक अडचणींचा सामना करूनही आपल्या कार्यावरील निष्ठा कमी होऊ दिली नाही. त्यांना रक्तदाबाचा त्रास होता पण त्यांनी आपल्या प्रकृतीकडे फार लक्ष दिले नाही. त्यांनी केलेले कार्य मोलाचे व दिशादर्शक आहे. त्यामुळेच या कार्याचे मोल ओळखून भारत सरकारने त्यांना २६ जानेवारी १९५९ रोजी पद्मभूषण किताब देऊन गौरविले आहे. अण्णांना लोकांनी स्वत:हून कर्मवीर ही उपाधी दिली होती. विद्यापीठांनी त्यांना डीलिट तर विविध संस्थांनी त्यांना मानपत्र देऊन गौरविले आहे. ९ मे १९५९ रोजी अण्णांचा मृत्यू झाला. अण्णांच्या कार्याचा गौरव अनेक विचारवंत वा नेत्यांनीही केला आहे. नरहर कुरुंदकर त्यांच्या कार्याबद्दल म्हणतात, “समाज शिकवणे, जागा करणे, हलविणे, त्यांच्यात सामाजिक व राजकीय नेतृत्व निर्माण करणे असे समाजपरिवर्तनाचे काम भाऊराव पाटील यांनी केले आहे.”